# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शैक्षणिक प्रवेश विभाग

### केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर ( Post Matric ) शिष्यवृत्ती योजना सन २०१५–१६

केंद्र शासनाकडून मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१५–१६ साठी Online पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. फक्त Online पध्दतीने भरलेले अर्जच स्वीकारले जाणार असून कोणत्याही परिस्थितीत Offline पध्दतीने अर्ज स्वीकारले जाणार नाही.

सोबत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेली जाहिरात जोडत आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेचे पालन करून User ID तयार करून Online अर्ज भरावा.

www.scholarships.gov.in

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करून ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

शासनाने विहीत केलेल्या मुदतीत जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही. तरी पात्र विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत अर्ज भरावे, यांची नोंद घ्यावी.

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/३४०२
दिनांक :०८/०८/२०१५

प्रत :मा. विभागप्रमुख

आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.
## जाहिरात
### केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१५-१६

केंद्रशासनाकडून **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०१५-१६ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच निर्धारित केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत.

❖ **<u>शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :</u>**

११ वी ते पी. एच्. डी, व्यावसायिक (डी. एड्., बी. एड्., एम.एड्., आय. टी. आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम. सी. व्ही. सी. अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

❖ **<u>किमान पात्रता व अटी :</u>**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा
३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४) नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.०० लाख इतकी आहे.
६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्याने नजीकच्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.

❖ **<u>अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी/नूतनीकरण):</u>**

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याच्या पासबुकवर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकुन नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Temporary Application ID प्राप्त होईल. हा ID (आय.डी.) वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा ID विद्यार्थ्यांस अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे. (अर्ज करताना यादीमध्ये आपल्या महाविद्यालयाचे नाव नसेल तर प्राचार्यांशी महाविद्यालयाच्या नावाच्या नोंदणीसाठी संपर्क साधावा.)
३) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी. विद्यार्थ्यांनी त्यांच्या माहितीसाठी ऑनलाइन भरलेल्या अर्जाची तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची प्रिंट काढून ठेवावी.

५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचा मागील वर्षीच्या अर्जात भरलेला बँक खाते क्रमांक वापरुन नूतनीकरणाचा अर्ज **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावर भरावा व अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावी.

६) नवीन व नूतनीकरणाचा अर्ज भरणा-या विद्यार्थ्यांनी ऑन लाइन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे (उदा.विद्यार्थ्याचा फोटो,चालु वर्षाची फी भरल्याची पावती,मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत,पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र,आधार कार्ड असल्यास इत्यादी) स्कॅन करुन ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे. त्यातील काही कागदपत्रांचे नमुना प्रपत्र (Template) डाउनलोड करुन प्रिंट काढून त्यातील माहिती भरुन नंतर ती कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे.(उदा.विद्यार्थ्याचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे स्वयंघोषित घोषणापत्र, विद्यार्थ्याचे घोषणापत्र, बोनाफाईड सर्टिफिकेट इत्यादी.)

७) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

८) विद्यार्थ्यांनी त्यांच्या अर्जाची हार्ड कॉपी पाठविण्याची आवश्यकता नाही.

❖ **महाविद्यालय/ सहसंचालक (उच्च शिक्षण) स्तरावर ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छाननी व अर्ज ऑनलाईन पाठविण्याची कार्यपद्धती :**

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालय/सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाइन मंजुरी देण्याची सविस्तर कार्यपध्दती **www.scholarships.gov.in** आणि **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर दिलेली आहे.

संबंधित महाविद्यालय/सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती त्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन तपासून घ्यावी. त्यानंतर पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीत तात्काळ पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावे.

❖ **महाविद्यालय/संस्थेच्या ऑनलाईन नोंदणीसाठी :**

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांची नावे सदर वेबसाईटवर दिसतात त्यांनी नव्याने ऑनलाईन नोंदणी न करता त्यांचा युजर आय.डी व पासवर्ड प्राप्त करुन घेण्यासाठी पुढील विहित प्रपत्रातील माहिती भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीची स्कॅन कॉपी नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshiphd@gmail.com** वर पाठवावी.

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांचे नाव **www.scholarships.gov.in** या वेबसाइटवर दिसून येत नाही त्यांनी संकेतस्थळावरील ऑनलाईन नोंदणीसाठी आपल्या महाविद्यालय/संस्थेची संपुर्ण माहिती ऑनलाइन भरावी तसेच खालील प्रपत्रामधील (Proforma) माहिती भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सदर प्रपत्राची तसेच महाविद्यालयाच्या शासन मान्यतेची प्रत स्कॅन करुन नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshiphd@gmail.com** वर पाठवावी.

शासनमान्य महाविद्यालये/संस्था यांनी त्यांचा कार्यालयीन ई-मेल आय.डी. व प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक संचालनालयाच्या वरील ई-मेल आय.डी. वर सादर केल्यानंतरच त्यांना त्यांच्या महाविद्यालय/संस्थांचा युजर आय.डी. व पासवर्ड ई-मेल / एसएमएसद्वारे ऑनलाईन प्राप्त होईल.

**प्रपत्र (PROFORMA)**

**INFORMATION OF THE INSTITUTE /COLLEGE FOR USER ID/PASSWORD OF POST MATRIC SCHOLARSHIP**

| Sr. No. | College/ Institute Name (as enrolled on website) | Institute code/AISHE code/ Registration no. (as enrolled on website) | Govt. / Govt. Aided / Private | Whether College Jr. / Sr. | Course / Faculty with duration | University / Board Name | Institute Address with Taluka & Pin Code | Inst. Dist rict | Details of the Principal/ Director | | | Details of the Staff handling Scholarship | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | Name | Mobile No. | College E-mail | Name | Mobile No. | College E-mail |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |

Principal's Signature and Stamp

महाविद्यालयांनी त्यांच्या नावाचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन **www.scholarships.gov.in** या वेबसाइटवर करुन उपरोक्त प्रपत्र व शासन मान्यता पत्र या संचालनालयाच्या **scholarshiphd@gmail.com** या ई-मेलवर दिनांक १.०९.२०१५ पर्यंत पाठवावे.

## ❖ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१५-१६ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १ | ऑनलाईन ॲप्लिकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचा व येणा-या सूचनेनुसार अर्जासोबतची कागदपत्रे अपलोड करण्याचा अंतिम दिनांक | १५.०९.२०१५ पर्यंत | १०.१०.२०१५ पर्यंत |
| २ | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जास महाविद्यालयाने ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | ५.१०.२०१५ पर्यंत | ३१.१०.२०१५ पर्यंत |
| ३ | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या अर्जांना ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | १५.१०.२०१५ पर्यंत | ८.११.२०१५ पर्यंत |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी जाहिरातीनुसार अंतिम दिनांकाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जांची तपासणी करून त्या अर्जांवर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

अधिक माहितीसाठी **www.scholarships.gov.in** हे संकेतस्थळ अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे **www.momascholarship.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाशी देखिल जोडलेले (Link) आहे. तसेच संकेतस्थळावर दिसणा-या helpline no.040-23120500/501/502/503/504/505 या क्रमांकावर किंवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

**(डॉ. धनराज माने )**
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

### अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ

उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील गुणवत्ताधारक धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता राज्याच्या शिष्यवृत्ती योजनेच्या कौटुंबिक उत्पन्नाच्या मर्यादेमध्ये सन २०१५-१६ पासून वाढ करण्यात येत आहे. **कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये अडीच लाखांवरून रुपये सहा लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे** याची नोंद सर्व पालक, महाविद्यालयांचे प्राचार्य, तंत्रनिकेतनचे प्राचार्य यांनी घ्यावी व त्यानुसार अर्ज स्वीकारावेत.

सही/-

(जैनुल अत्तार)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

[illegible]